CMYK

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## घरभाड्याच्या वादातून वृद्धावर कोयत्याने हल्ला

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ एप्रिल -**

घरभाड्याच्या कारणावरून झालेल्या वादातून भाडेकरूने वृद्धावर कोयत्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना शहरातील बार्शी रोड परिसरात घडली आहे.

या हल्ल्यात वृद्ध गंभीर जखमी झाले असून आरोपीविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत शैलेंद्र राजाभाऊ स्वामी (वय ३७, रा. आदित्य पेट्रोल पंपासमोर, बार्शी रोड, धाराशिव) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. १२ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ७.२० वाजता त्यांच्या वडिलांना राजाभाऊ स्वामी यांना आरोपी राजेश अनिल झोंबाडे (रा. राजाभाऊ स्वामी यांच्या घरी भाड्याने) याने घरभाड्याच्या कारणावरून शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी व लोखंडी कोयत्याने मारहाण केली.

या हल्ल्यात राजाभाऊ स्वामी गंभीर जखमी झाले असून आरोपीने त्यांना जीवे मारण्याची धमकीही दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### कळंब शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**कळंब, दि.१४ एप्रिल -**

महामानव बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त कळंब शहरात विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून उत्साहात जयंती साजरी करण्यात आली. यावेळी शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच शहरातील विविध भागात रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे, व्याख्यानमाला आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यासोबतच अनेक ठिकाणी नागरिकांना अल्पोपहार, मसाला राईस, बिस्कीट आदींचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये भीम अनुयायी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### लोणावळ्यात ड्युटीवर असताना एएसआय कवडे यांचे निधन

**धाराशिव, दि.१४ एप्रिल -**



पोलीस ठाण्यात कार्यरत सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (एएसआय) तथा चालक धनंजय मारुतीराव कवडे (वय ५५, रा. धाराशिव) यांचे लोणावळा येथे ड्युटीवर असताना हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मुंबई-ठाणे परिसरात तपास कामासाठी गेलेल्या कवडे यांनी उशीर झाल्याने लोणावळा येथे मुक्काम केला होता. रात्री अचानक त्यांना हृदयविकाराचा झटका आला. सहकाऱ्यांनी तातडीने रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यांच्या आकस्मिक निधनामुळे पोलीस दलात व कुटुंबीयांमध्ये शोककळा पसरली आहे.



### भूम नगरपरिषदेत डॉ. आंबेडकर यांना जयंतीनिमीत्त अभिवादन

**भूम, दि.१४ एप्रिल -**

शहरातील नगरपरिषद कार्यालयात भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त उत्साहात कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रभारी मुख्याधिकारी तथा नायब तहसीलदार प्रवीण जाधव यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाला जनशक्ती विकास आघाडीचे नगरसेवक रुपेश शेंडगे, अनिल शेंडगे, आबासाहेब मस्कर, चंद्रमणी गायकवाड, आदम शेख यांच्यासह न.प.चे कर्मचारी उपस्थित होते.

### हॉटेल व रसवंती गृहात चोरी

**कळंब, दि.१४ एप्रिल -**

तालुक्यातील पिंपळगाव डोळा शिवारातील हॉटेल व रसवंती गृहात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून विविध साहित्य चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबत कृष्णा व्यंकट इंगोले (वय ३०, रा. पिंपळगाव डोळा ता. कळंब जि. धाराशिव) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांच्या शेत गट नं. ५० मधील 'दत्तगुरु' नावाचे हॉटेल व रसवंती गृहाच्या पत्र्याच्या शेडच्या पाठीमागील दरवाज्याचे कडी-कोंडा अज्ञात व्यक्तीने दि.१२ एप्रिल २०२६ रोजी पहाटेच्या दरम्यान तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी गव्हाचे चार कट्टे, मोबाईल फोन, ७,००० रुपयांची रोख रक्कम तसेच प्लास्टिकच्या भरण्या, वेफर्स व भंडारा पाकीट असा एकूण १९,००० रुपयांचा माल चोरून नेला. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.



# वंदन महामानवाला, क्रांतिसूर्याला धाराशिव शहरात हजारो भीम अनुयायी नतमस्तक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ एप्रिल -**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त धाराशिव शहरात अभूतपूर्व उत्साहाचे आणि भक्तिभावाचे वातावरण पाहायला मिळाले. हजारो भीम अनुयायी मोठ्या संख्येने एकत्र येत महामानवाच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन केले.

शहरातील विविध भागांतून अनुयायांनी मिरवणुका काढत, जयभीमच्या घोषणांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसर दणाणून सोडला. ठिकठिकाणी बाबासाहेबांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून त्यांचे विचार आणि कार्य यांची उजळणी करण्यात आली. समाजातील वंचित, शोषित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेले योगदान यावेळी ठळकपणे मांडण्यात आले.

बाबासाहेबांनी प्रज्वलित केलेली भारतीय संविधानाची ज्योत आजही समाजाला दिशा देणारी ठरत आहे. त्यांच्या विचारांमुळे देशाचे सार्वभौमत्व, एकता आणि अखंडता अधिक दृढ झाली आहे. त्यांच्या विचारांचे आचरण करणे हीच खरी आदरांजली, असा संदेशही यावेळी देण्यात आला.

यंदा धाराशिव नगरपरिषदेच्या वतीने उभारलेला भव्य देखावा विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. सुमारे ४५ फूट उंच घुमट, रंगीबेरंगी रोषणाई आणि दीक्षाभूमीची साकारलेली भव्य प्रतिकृती पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली.



हा देखावा केवळ सजावट न राहता बाबासाहेबांच्या विचारांना अभिवादन करणारा प्रेरणादायी उपक्रम ठरत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

दरम्यान, शहरात सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. युवकांनी रक्तदान शिबिरे, स्वच्छता मोहिमा आणि विविध जनजागृती उपक्रम राबवून बाबासाहेबांच्या विचारांना कृतीतून अभिवादन केले.

धाराशिव नगरीत साजरी झालेली ही जयंती केवळ उत्सव न राहता समाजजागृतीचा आणि प्रेरणेचा संदेश देणारी ठरली.

## अखेर चोराखळीतील 'महाकाली कला केंद्र' सील




### केंद्राचा परवाना कायमस्वरूपी रद्द...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ एप्रिल -**

कळंब तालुक्यातील चोराखळी येथील वादग्रस्त 'महाकाली कला केंद्र'वर अखेर प्रशासनाने कठोर कारवाई करत त्याचा परवाना कायमस्वरूपी रद्द केला आहे. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या आदेशानंतर महसूल व पोलीस प्रशासनाने संयुक्त मोहिम राबवत हे केंद्र अवघ्या २४ तासांत सील करण्यात आले.

महाकाली कला केंद्राविरोधात गेल्या अनेक दिवसांपासून तक्रारी, चौकश्या आणि न्यायालयीन प्रक्रिया सुरू होती. केंद्राचे चालक राजाभाऊ सीताराम माळी यांनी छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका सुनावणीदरम्यान मागे घेतल्याने प्रशासनाचा मार्ग मोकळा झाला. यामुळे न्यायालयाने यापूर्वी दिलेला अंतरिम दिलासाही रद्द झाला.

या प्रकरणात पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांनी ठोस भूमिका घेत कारवाईचे निर्देश दिले होते. तसेच पोलीस अधीक्षक रितु खोखर यांनी केंद्र सील करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला होता.

महसूल व पोलीस विभागाच्या संयुक्त अहवालात केंद्रातील गंभीर अनियमितता उघड झाल्या.

चौकशीत इमारतीसाठी आवश्यक बांधकाम परवानगी नसणे, प्रवेश-निर्गमनासाठी स्वतंत्र मार्गांचा अभाव, रंगमंच व प्रेक्षकांसाठी मूलभूत सुविधांची कमतरता, १० वातानुकूलित खोल्यांमध्ये नृत्य सादरीकरण, पारंपरिक कलेऐवजी साउंड सिस्टीमवर कार्यक्रम, तिकीट व्यवस्थेत पारदर्शकतेचा अभाव व जीएसटी नोंदी नसणे, कलाकारांची माहिती पोलिसांकडे न सादर करणे, परिसरात बिअर बार व लॉजिंग सुरू असल्याच्या नोंदी, ग्रामसभेचा ठराव व आवश्यक कागदपत्रांचा अभाव अशा त्रुटी आढळून आल्या.



या सर्व बाबींचा विचार करून जिल्हाधिकाऱ्यांनी परवाना रद्द करून तात्काळ सील करण्याचे आदेश दिले. आदेशानुसार कळंब तहसील कार्यालय व येरमाळा पोलीस प्रशासनाने संयुक्त कारवाई करत केंद्र बंद केले.

या कारवाईनंतर परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त करत प्रशासनाचे आभार मानले आहेत. मात्र, हे केंद्र पुन्हा अनधिकृतरित्या सुरू होऊ नये यासाठी सातत्याने देखरेख ठेवावी, अशी मागणीही करण्यात येत आहे.

या कारवाईमुळे जिल्ह्यातील अवैध कला केंद्रांवर प्रशासनाची कडक नजर राहणार असून भविष्यात अशा बेकायदेशीर उपक्रमांवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचे संकेत मिळाले आहेत.

## आम्ही पोलीस आहोत सांगत वृद्ध महिलेची फसवणूक

### ६० हजारांचे सोन्याचे गंठन लंपास...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१४ एप्रिल -**

शहरात बनावट पोलीस असल्याचे भासवून वृद्ध दांपत्याची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली असून या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

याबाबत उन्नती भामंडळ मेहता (वय ७२, रा. मंगरुळ ता. तुळजापूर जि. धाराशिव) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. १२ एप्रिल रोजी दुपारी सुमारे ३.१५ वाजता त्या व त्यांचे पती मंगरुळ येथे जात असताना तुळजापूर येथील सैनिक स्कूलच्या पुढे रस्त्यावर दोन अनोळखी इसमांनी त्यांना अडवले.




सदर इसमांनी आम्ही पोलीस आहोत असे सांगून शहरात चोऱ्या होत असल्याचे भासवले व सुरक्षिततेच्या कारणावरून फिर्यादीच्या गळ्यातील सुमारे दोन तोळ्यांचे सोन्याचे मिनी गंठन (अंदाजे किंमत ६०,००० रुपये) पर्समध्ये ठेवण्यास सांगितले. मात्र, पर्समध्ये ठेवण्याच्या बहाण्याने ते गंठन स्वतःजवळ ठेवून आरोपी तेथून पसार झाले.

या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## सोलार कंपनीच्या साहित्याची चोरी; ४६ हजारांचा माल लंपास

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१४ एप्रिल -**

तालुक्यातील गौरगाव येथे सोलार प्रकल्पासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याची चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरोधात शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




याबाबत जिवन गोपीनाथ चौधरी (वय २७, व्यवसाय टेक्निशियन, निमेश एनर्जी सोल्युशन प्रा. लि. शाखा गौरगाव ता. कळंब जि. धाराशिव) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि.२४ मार्च रोजी रात्रीच्या सुमारास गौरगाव येथील सोलार प्लॉटवरून अज्ञात व्यक्तींनी कंपनीचे साहित्य चोरून नेले.

चोरीस गेलेल्या साहित्यामध्ये ६ स्क्वेअर एम.एम. क्षमतेच्या काळ्या रंगाच्या कॉपर केबल (८०० मीटर), त्याच प्रकारची आणखी ८०० मीटर केबल, एमसी-४ कनेक्टर (मेल व फिमेल) प्रत्येकी १५० नग, वाय कनेक्टर (मेल) २५ नग, पीयू फोम ५ कॅन, डी.डब्ल्यू.सी. कंड्युट पाईप (भगवा रंग, १०० मीटर) तसेच केबल टाय ४०० नग असा एकूण ४६,००० रुपयांचा माल समाविष्ट आहे.

या प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## तेरखेड्यात कापड दुकानाला भीषण आग

### लाखोंचे नुकसान, आमदारांकडून ५ लाखांची मदत जाहीर...

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१४ एप्रिल -**

तालुक्यातील तेरखेडा येथे कापडाच्या दुकानाला लागलेल्या भीषण आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची घटना सोमवारी (दि.१३) सायंकाळी घडली.

तेरखेडा येथील व्यापारी दत्तात्रेय गोळे हे अनेक वर्षांपासून कापड व्यवसाय करत असून सायंकाळी सहाच्या सुमारास त्यांच्या दुकानात अचानक आग भडकली. आग लागल्यानंतर तात्काळ अग्निशमन यंत्रणा उपलब्ध न झाल्याने दुकानातील कापड, फर्निचर व इतर साहित्य पूर्णपणे जळून खाक झाले. या आगीत मोठे आर्थिक नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.



दरम्यान, तेरखेडा जिल्हा परिषद गटाचे सदस्य विकी चव्हाण यांनी आमदार तानाजीराव सावंत यांना घटनेची माहिती दिली. त्यानंतर आमदार सावंत यांनी तात्काळ दुकानदाराशी संपर्क साधत ५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली. यावेळी आमदार सावंत म्हणाले, मी पूर्णपणे तुमच्या पाठीशी आहे. खचून न जाता धैर्याने उभे राहा. तुम्हाला जी काही मदत लागेल, ती करण्यासाठी मी सदैव तयार आहे.

या मदतीमुळे संकटात सापडलेल्या गोळे कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला असून तेरखेडा गावातील नागरिकांनी आमदार सावंत यांचे आभार मानले आहेत.

## परंडा तालुक्यात ७३ हजारांची घरफोडी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१४ एप्रिल -**

तालुक्यातील आरणगाव येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ७३ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे.

याबाबत विनोद चंद्रकांत पिंगळे (वय ३४, रा. आरणगाव ता. परंडा) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि.८ एप्रिल रोजी अज्ञात व्यक्तीने त्यांच्या राहत्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला.चोरट्यांनी घरातील सुमारे ११ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने तसेच २५ हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण ७३ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला.

# शोधू कुठे तुला मी रस्त्यारे...; पांढरेवाडीतील गायकवाड वस्तीचा मार्ग भर उन्हाळ्यात पाण्याखाली



> गायकवाड वस्तीकडे जाण्यासाठी आधीच रस्ता खराब होता. आता ओढ्याला उन्हाळ्यातही पाणी आल्याने अंगणवाडीतील बालके व शाळकरी मुलांचे येणे-जाणे बंद झाले आहे. त्या ठिकाणी ओढ्यावर नळ्या टाकून तात्पुरती व्यवस्था करावी.
> - **सुदर्शन चव्हाण** (गायकवाड वस्ती निवासी)

> गायकवाड वस्तीच्या रस्त्यासाठी नळ्यांचा पूल व खडीकरणाचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवलेला आहे. मंजुरी मिळताच पूल व रस्त्याचे काम सुरू करण्यात येईल.
> - **उत्तमराव गुळवे** (ग्रामपंचायत अधिकारी, ईट)

**महावीर जालन**
**भूम, दि.१४ एप्रिल -**

सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू असतानाही भूम तालुक्यातील पांढरेवाडी येथील गायकवाड वस्तीला जाणारा रस्ता पाण्याखाली गेल्याने ग्रामस्थांचे हाल होत आहेत. ओढ्याला पाणी सुटल्यामुळे महिला, शाळकरी मुले व शेतकऱ्यांचा दळणवळण पूर्णपणे विस्कळीत झाला आहे.

गायकवाड वस्तीतील नागरिकांना या पाण्यातूनच जीव धोक्यात घालून ये-जा करावी लागत आहे. विशेषतः शाळकरी मुलांना व अंगणवाडीतील बालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून त्यांचे शिक्षणही बाधित होत आहे. लहान वाहने, दुचाकी चालवताना मोठी कसरत करावी लागत आहे.

**ग्रामस्थांची मागणी...**

गायकवाड वस्तीला तात्काळ पर्यायी मार्ग उपलब्ध करून द्यावा व ओढ्यावर पूल बांधण्याचे काम त्वरित हाती घ्यावे, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांतून होत आहे.

स्थानिक शेतकरी व रहिवाशांनी ग्रामपंचायत कार्यालय, आजी-माजी आमदार तसेच खासदारांकडे वारंवार मागणी करूनही या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप केला जात आहे. पावसाळ्यात हा परिसर पूर्णपणे पाण्याने वेढला जातो, मात्र आता उन्हाळ्यातही तीच परिस्थिती निर्माण झाल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

याशिवाय पांढरेवाडीहून वस्तीकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून, जवळचा मार्गही बंद झाला आहे. अनेक वर्षांपासून हा प्रश्न कायम असून 'खावूजा' धोरणामुळे रस्त्याची दुरवस्था झाल्याची टीका ग्रामस्थ करत आहेत. परिणामी, शोधू कुठे तुला मी रस्त्यारे... असे म्हणण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

## भाजप नेते प्रा. गीते यांच्या गाडीची तोडफोड; चालकास मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१४ एप्रिल -**

तालुक्यात सोमवारी (दि.१३) सकाळच्या सुमारास भाजप नेते प्रा. ज्ञानेश्वर गीते यांच्या गाडीची तोडफोड करून चालकास मारहाण केल्याची घटना घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रा. ज्ञानेश्वर गीते हे कामानिमित्त भूम येथे आले होते. यावेळी त्यांच्या मामेभावा शंकर नागरगोजे यांच्या मालकीची मारुती स्विफ्ट डिझायर (एमएच ०२ सीएल ५६८२) गाडी उभी असताना आरोपी संदेश शाम वीर (रा. भूम) यांनी लोखंडी पाईपने गाडीच्या समोरील काच फोडून मोठे नुकसान केले. त्यावेळी गाडीचे चालक परमेश्वर भागवत गिरी व सहाय्यक अशोक चव्हाण हे तेथे उपस्थित होते. आरोपीने त्यांना मारहाण करत शिवीगाळ केली तसेच प्रा. गीते यांना जीवे मारण्याची धमकी दिली. घटनेनंतर काही वेळात सुनिल पोपट देशमुख, अमर सुनिल देशमुख, बाबासाहेब रमेश भोसले व अर्जुन किसन सुळ (सर्व रा. ईट/भूम) हेही घटनास्थळी आले. त्यांच्या हातात लोखंडी पाईप व फायबर दांडे होते. सर्वजण गाडीत प्रा. गीते यांना शोधत आरडा-ओरडा व शिवीगाळ करत होते. दरम्यान, प्रा. गीते हे निघून गेल्याने मोठा अनर्थ टळला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

# शिरूर ताजबंदला होणार लवकरच उप बाजारपेठ



तभा वृत्तसेवा
शिरूर ताजबंद, दि. १४ एप्रिल : शिरूर ताजबंद येथे कृषी उत्पन्न बाजार समिती अहमदपूरची उपबाजारपेठ सुरू करण्यासाठी हालचालींना वेग आला असून सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या सहकार्याने लवकरच उपबाजारपेठ सुरू होणार आहे.

अहमदपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मंचकराव पाटील व संचालक मंडळाने सहकार मंत्री पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची जागा मिळवण्यासाठी मंत्री गुलाबराव पाटील यांची भेट घेतली. यावेळी संबंधित जागा उपबाजारपेठ उभारण्यासाठी भाडे तत्वावर किंवा हस्तांतरणाद्वारे अहमदपूर बाजार समितीला देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. शिरूर ताजबंद येथे उपबाजारपेठ सुरू झाल्यास परिसरातील शेतकऱ्यांना आपल्या शेतीमालाच्या विक्रीसाठी दूरवर जावे लागणार नाही. त्यामुळे वाहतूक खर्चात बचत होऊन शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे, असेही या वेळी सांगण्यात आले. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी या उपक्रमासाठी पुढाकार घेतल्याबद्दल परिसरातील शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

# संविधान सप्ताहानिमित्त संविधानिक मूल्यांचा जागर

तभा वृत्तसेवा
लातूर, दि. १४ एप्रिल : समाज कल्याण विभागांतर्गत चालविण्यात येणाऱ्या मागासवर्गीय शासकीय वसतिगृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त संविधान सप्ताह उत्साहात साजरा करण्यात येत आहे. या निमित्ताने वसतिगृहातील कर्मचारी व निवासी विद्यार्थ्यांच्या सहभागातून विविध शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

संविधान संवर्धन व संरक्षणाच्या दृष्टीने भीम गीत गायन, विविध स्पर्धा तसेच तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत. त्या अनुषंगाने नुकतेच संविधानिक मूल्ये, अधिकार आणि कर्तव्ये या विषयावर विशेष व्याख्यान पार पडले. या कार्यक्रमासाठी लातूर येथील मातोश्री केशरबाई काळे अध्यापक महाविद्यालयाच्या प्राचार्या तथा संविधान सेवा संघाच्या संस्थापक अध्यक्षा प्रा. डॉ. शहेजादी शेख तसेच संविधान सेवा संघाचे संस्थापक ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. गोविंद सिरसाट हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. दोन्ही मान्यवरांनी विद्यार्थ्यांना भारतीय संविधानातील कायदे, त्यांचे बदलते स्वरूप, बेकायदेशीर कृत्यांचे परिणाम तसेच संविधानिक स्वातंत्र्य, अधिकार, कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या यांविषयी मार्गदर्शन केले. यावेळी वसतिगृहाचे व्यवस्थापक बारकुल, सराफ तसेच श्रीमती सुकळकर उपस्थित होते.

# सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचा ठिय्या

तभा वृत्तसेवा
लातूर, दि. १४ एप्रिल : जिल्हा परिषद सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे माहे मार्चचे निवृत्तीवेतन प्रशासनाच्या उदासीनतेमुळे अद्याप खात्यावर जमा न झाल्यामुळे संघटनेच्या वतीने जिल्हा परिषदेच्या महाद्वारात ठिय्या आंदोलन करण्यात आले.
यावेळी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा उषा पाटील यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी शाम वाखर्डे यांना सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन तात्काळ बँक खातेवर जमा करण्याबाबत सर्व गटविकास अधिकाऱ्यांना सूचना देण्यात याव्यात असे सांगितले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी शाम वाखर्डे यांनी सर्व तालुक्याना निवृत्तीवेतन तात्काळ जमा करण्याबाबत सूचना दिल्या व लवकरच सर्वांना निवृत्तीवेतन मिळेल असे सांगितले. त्यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी वाखर्डे यांना सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न तात्काळ सोडविणे बाबत संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी वाखर्डे यांनी निवेदनावर सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल व यापुढे दर महा एक तारखेला पेन्शन बँक खातेवर जमा करण्याची कार्यवाही केली जाईल असे सांगितले.
यावेळी सेवानिवृत्त कर्मचारी अध्यक्ष भातांब्रेकर संघटनेचे भानुदास, एनाडले जी. बी., मन्मथ शेटे, दिनकर आळंगे, आर. ए. ढेकणे, स्वयंप्रकाश गोस्वामी, डी. डी. भिसे, संजय माने, झेड. ए. सय्यद, शृंगारे, वडवळे, धावरे, खडबडे, गव्हाणे, जाधव, कुलकर्णी, जाधव, गवळी, दुरुगकर हजारे सत्तार, वजीद सय्यद, अंकुलगे, शिंदे उपस्थित होते.

# देवराव चव्हाण यांचे निधन

निलंगा : तालुक्यातील केळगाव येथील भारतीय संस्कृती पोषक संस्थेचे कोषाध्यक्ष तथा केळगाव येथील ज्येष्ठ नागरिक देवराव नागोराव चव्हाण यांचे प्रदीर्घ आजाराने ( वय ८५) दि १२ एप्रिल रोजी सकाळी दुःख निधन झाले आहे. त्यांच्यावर सोमवार दि १२ एप्रिल रोजी येथील सार्वजनिक स्मशानभूमीत दुपारी ४ वा अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्र्चात दोन मुले,सुना नातवंडे असा परिवार आहे.ते शिवाजी विद्यालय निलंगा येथे कार्यरत सहशिक्षक संजय चव्हाण व विठ्ठलराव चव्हाण यांचे ते वडील होत.

# जलसंधारणाच्या कामासाठी निधी कमी पडणार नाही : जिल्हाधिकारी डॉ भारत बास्टेवाड

## फत्तेपुर येथे जलसमृद्ध अभियानाचा शुभारंभ



तभा वृत्तसेवा
औसा दि, १४ एप्रिल :- वविध विभागांच्या अनेक योजना तयार असून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी लोकसहभाग अत्यंत महत्वाचा आहे. योजना देणारे हात जितके सक्षम आहेत. तितकेच स्वीकारणाऱ्यांचेही हात सक्षम असले पाहिजेत. जलसंधारणाच्या कामांमध्ये केवळ पाणी अडवा, पाणी जिरवा एवढ्यावर न थांबता पाण्याची बचत आणि योग्य व्यवस्थापन यावरही भर देणे गरजेचे आहे.आगामी काळात जलसंधारण योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर कामे हाती घेतली जाणार असून पावसाळ्यापूर्वी ती पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. अपूर्ण राहिलेल्या मनरेगा आणि विहिरींच्या कामांना पुढील १५-२० दिवसांत पूर्ण केल्यास नवीन कामे देण्यात येतील आणि निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी दिली.
महाराष्ट्र शासन, क्रिएटिव्ह फाऊंडेशन्, टाटा मोटार्स आणि नाम फाऊंडेशन यांच्या संयुक्त भागीदारीतून औसा तालुक्यात जलसंधारणाला नवी चालना देणाऱ्या जलसमृद्ध औसा अभियान टप्पा १ चा शुभारंभ फत्तेपुर येथे करण्यात आला. त्यावेळी जिल्हाधिकारी डा. भारत बास्टेवाड बोलत होते. आमदार अभिमन्यू पवार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना,क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष ड परीक्षित पवार, टाटा मोटर्स फाउंडेशनचे प्रमोद घायाळ, पंचायत समिती सभापती गंगाबाई कोदळीकर, उपसभापती अमोल पाटील, सभापती चंद्रशेखर सोनवणे, संतोष मुक्ता,सदाशिव जोगदंड,संदिपान शेळके, सुभाष पवार, श्याम पाटील, रवी चिलमे, व्यंकट पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.
जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड म्हणाले, २००३ ते २००८ दरम्यान लातूर येथे कार्यरत असताना औसा तालुक्यात पाण्याची तीव्र टंचाई होती. त्या काळात आंदूरपर्यंत हिरवळ दिसत नव्हती आणि पंधरा दिवसांनी पाणी मिळायचे. मात्र आता परिस्थितीत सकारात्मक बदल दिसत आहे. या बदलाला अधिक गती देण्यासाठी जलसमृद्ध अभियान निर्णायक ठरणार असल्याचा विश्र्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.जलसंधारण, लोकसहभाग आणि शाश्र्वत विकास यांचा संगम साधणारे अभियान औसा तालुक्याला जलसमृद्ध बनविण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी लातूर जिल्हा जलमय करण्याच्या उद्दिष्टाने शासन आपल्याला सर्वतो मदत करण्यास तयार असून यामध्ये लोकसहभाग याची गरज असल्याचे सांगितले.

### अभियानातून ७० गावांच्या विकासाचा संकल्प आ. पवार

जलसमृद्ध औसा अभियान अंतर्गत औसा तालुक्यातील निवडक ७ गावे सर्वांगीण सक्षम करून त्यांचा मॉडेल विकास करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. पुढील टप्प्यात तेरणा, मांजरा व तावरजा नदीकाठच्या गावांसह सुमारे ६० ते ७० गावांमध्ये हा उपक्रम विस्तारण्याचा मानस असल्याचे आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितले. रस्ते, वीज, पाणी यांसारख्या मूलभूत सुविधांसोबतच जलसंधारणावर भर देण्यात येणार असून जलमय औसा हा मुख्य उद्देश आहे.

### ठिबक सिंचनावर भर द्यावा : राहुल कुमार मीना

शेतकऱ्यांनी पाणी बचतीसाठी आधुनिक सिंचन पद्धतींचा अवलंब करावा. जेणेकरून पाण्याचा अपव्यय कमी होऊन जलस्रोतांचे संरक्षण होईल.जलसमृध्द अभियान शेतकरी-केंद्रित असून त्याच्या यशासाठी व्यापक लोकसहभाग अत्यंत आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. जलसंधारणासोबतच शेतीतील उत्पादन वाढवण्यासाठीही हीच पद्धत उपयुक्त ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. जलसमृद्ध औसा अभियानातून शाश्र्वत शेती विकासाचे उद्दिष्ट साध्य होईल, असा विश्वासही मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना यांनी व्यक्त केला.

### जलसमृद्ध अभियानातून तरुणांनी कायापालट करावा : ॲड. पवार

जलसमृद्ध अभियानातून गावांच्या विकासासाठी सुवर्णसंधी असून या उपक्रमात तरुणांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे.गावकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून आपण हे अभियान यशस्वी करायचे असून सर्व मतभेद बाजूला ठेवून एकत्रितपणे काम केल्यास गावांचा कायापालट शक्य असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच या अभियानाच्या माध्यमातून जलसंधारणासोबतच सर्वांगीण विकास साधण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

# स्मार्ट मिटर विरोधातील रयत क्रांती संघटनेचे आंदोलन चिघळले



तभा वृत्तसेवा
निलंगा दि, १४ एप्रिल : शिरूर अनंतपाळ तालुक्यातील ग्राहकांना मागील चार पाच महिन्यापासून अवरेज बिल देऊन ज्या ग्राहकाला २००/३०० बिल येत होते ते आता अचानक वाढून १०००/२००० युनिटचे बिल येत आहे. ग्राहकाचा वापर वाढला नाही पण बिल मात्र भरमसाट वाढले आहे त्यामुळे विजबिल भरणे अडचणीचे होत आहे. वाढीव बिलासाठी विचारणा करण्यासाठी ग्राहक महावितरण च्या ऑफिसला गेले असता ग्राहकांचे म्हणणे ऐकून न घेता संबंधित अभियंता मीटर बदलून घ्या असे सांगत आहेत.
ग्रामीण भागात प्रत्येक गावात स्मार्ट मीटर बसवायला सुरुवात केली आहेत. ते थांबवण्यात यावे ग्राहकाची संमती असल्याशिवाय मीटर बसवता येत नाही पण कुठल्याही ग्राहकांच्या संमती विना मीटर बसवले जात आहेत. एका विशिष्ट कंपनीचे मीटर बसवून सरकार सामान्य नागरिकांवर याचे दंड बसवून कंपनीचा फायदा करत आहे. नंतर त्याच कंपनीला खाजगीकरणाच्या माध्यमातून महावितरण कंपनी त्यांच्याकडे वर्ग करून द्यावयाचे षडयंत्र आहे की काय अशी कुजबूज ग्राहकांच्या समुहातुन ऐकायला मिळत आहे.
रयत क्रांती संघटनेच्या माध्यमातून दि. २२.०९.२०२५ रोजी आपल्या कार्यालयास निवेदन देण्यात आले होते पण त्यावर आजपर्यंत आम्हला कसलेच उत्तर मिळाले नाही.म्हणुन परत दि.३०/१०/२०२५ रोजी आपल्या कार्यालायसमोर बिलाची होळी केली परंतु महावितरणच्या अधिकाऱ्यांना याचे काहीच देणंघेणं नाही अशा पद्धतीची आम्हाला वागणुक दिसली. आमच्या शिरूर अनंतपाळ तालुक्यातील सामान्य नागरिकाची मागील चार पाच महिन्यापासून महावितरण कडून ग्राहकांच्या घरगुती मीटरचे फाल्टी व अवरेज बिल देऊन व इतर टॅक्स लावून ४.८१ पैसे दर युनिट प्रमाणे असताना व त्यात इतर टॅक्स लावून ९.६२पैसे या प्रमाणे बिल वसुली केली जात आहे. दि.२८/११/२०२५ रोजी महावितरण कार्यलयातील बहिरे झालेल्या व झोपेचे सोंग घेतलेल्या कर्मचाऱ्यांना जागी करण्यासाठी हालगी (नाद) वाजून निषेध केला तरी पण हे बहिरे झालेले कर्मचारी अजून जागे झाले नाहीत. त्या वेळी आपल्या कार्यालाया कडून असे सांगण्यात आले होते कि, एक महिन्यात आमच्या मागण्याची दखल घेऊन ती वरिष्ठ अधिकारी यांना कळवून मार्ग काढू असे सांगितले होते. परंतु त्यावर अद्याप कुठलीही कार्यवाही झाली नाही तर आम्ही लाईटचे कनेक्शन डायरेक्ट करून चालवू. व जो पर्यंत स्मार्ट मीटर शिवाय दुसरे मीटर बसवून योग्य लाईट बिल देत नाही. तो पर्यंत आम्ही आकडे टाकून लाईट वापरणार आहोत आम्ही अनेक वेळा सदरील प्रशासनाला निवेदन दिले आहेत परंतु आमच्या निवेदनाची कसलीच दखल घेत नसल्याने दि.२/३/२०२६रोजी आपल्या कार्यालया समोर तालुक्यातील स्मार्ट मिटर जमा करून आपल्या कार्यालयाचा जाहीर निषेध करुन जर आठ दिवसांत या विषयावर ठोस निर्णय नाही झाला तर तिव्र आंदोलन केले जाईल असेही निवेदनात म्हटले आहे.
या आंदोलनात सहभागी रयत क्रांती संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष शिवाजीराव समर्थ पेटे, जिल्हा परिषद सदस्य माणिकराव गायकवाड, पंचायत समिती सदस्य हमीद पटेल, गोविंद श्रीमंगले, गोपाळ हजारे, माधव घारोळे, माधव गुडे या सह तालुक्यातील असंख्य पिडीत विज ग्राहक उपस्थित होते.

# अ. भा. मराठी पत्रकार परिषदेचे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन उदगीरला

तभा वृत्तसेवा
उदगीर , दि. १४ एप्रिल : अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन १८ आणि १९ एप्रिल २०२६ रोजी रोजी उदगीर येथे आयोजित करण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून संपादक राजेंद्र दर्डा अधिवेशनाचे उद्घाटन करणार आहेत. सहकारमंत्री बाबासाहेब पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.
बांधकाम मंत्री तथा पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले हे अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष आहेत तर आमदार संजय बनसोडे सहस्वागताध्यक्ष आहेत. परिषदेचे मुख्य विश्र्वस्त एस.एम. देशमुख हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राहणार आहेत तर मिलिंद अष्टीवकर, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांचे मार्गदर्शन पत्रकारांना लाभणार आहे. १८ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता स्वामी विवेकानंद शैक्षणिक संकुलात अधिवेशनाचे उद्घाटन होईल. तत्पूर्वी उदगीर शहरातून प्रभात फेरी काढली जाणार असून त्यामध्ये शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थी सहभागी होतील. दुपारच्या सत्रात उदगीरमधून बाहेर पडून पत्रकारितेच्या क्षेत्रात देदीप्यमान यश मिळविणाऱ्या पत्रकारांचा सत्कार आणि त्यांच्या मनोगताचा कार्यक्रम होईल. दुपारी ४ ते ५.३० या वेळेत 'लोकप्रतिनिधींच्या माध्यमांकडून अपेक्षा' या विषयावर
रोहीत पवार यांची मुलाखत घेतली जाणार आहे. रात्री ७ वाजता मनोरंजनाचा कार्यक्रम होईल. १९ एप्रिल रोजी सकाळी ९.३० वाजता राष्ट्रवादीचे प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे याची मुलाखत होईल. संपादक प्रसन्न जोशी ही मुलाखत घेतील. सकाळी १०.३० ते १२.३० या वेळेत माध्यमं सत्ताधाऱ्यांना झुकतं माप देताहेत का? या विषयावरील परिसंवादात केशव उपाध्ये, हनुमंत पवार, सुरज चव्हाण, राहूल लोंढे, जयेश वाणी हे सहभागी होतील. पत्रकारांची बाजू मांडतील ज्येष्ठ पत्रकार जतीन देसाई. दुपारी १.३० ते ३ या वेळेत टीव्हीच्या पडद्यावरची दुनिया या विषयावरील चर्चेत प्रसन्न जोशी, विशाल परदेशी, प्रज्ञा पोवळे, श्र्वेता दांडेकर, सौरभ कोरटकर, विशाल पाटील सहभागी होतील. दुपारी ३ ते ५ या वेळात अधिवेशनाचा समारोप होईल.
समारोप समारंभात लातूर जिल्ह्यातील कांही मान्यवर पत्रकारांचा सत्कार करण्यात येणार आहे.
अधिवेशनास राज्यातील पत्रकारांनी मोठ्या संख्येनं उपस्थित राहण्याच आवाहन विश्र्वस्त किरण नाईक, विश्र्वस्त शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, डिजिटल मिडिया परिषदेचे प्रमुख अनिल वाघमारे, विभागीय सचिव तसेच अधिवेशन मुख्य संयोजक सचिन शिवशेट्टे, रवी उबाळे, उपाध्यक्ष प्रकाश कांबळे, उदगीर तालुका मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष युवराज धोतरे, लातूर जिल्हा डिजिटल मिडीयाचे अध्यक्ष विभीषन मद्देवाड, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे निमंत्रक अर्जुन जाधव, जिल्हा डिजिटल मिडीयाचे सचिव सिद्धार्थ सूर्यवंशी संयोजन समितीचे पदाधिकारी यांनी केले आहे.

# शिवसेना शाखा प्रमुखांची बैठक उत्साहात

तभा वृत्तसेवा
उदगीर,दि. १४ एप्रिल : शिवसेना उदगीर-जळकोट तालुक्याची शाखाप्रमुख आणि पदाधिकारी यांची बैठक लोकसभा संपर्कप्रमुख आमदार मंगेश कुडाळकर यांच्या अध्यक्षतेखाली व माजी आमदार सुधाकर भालेराव व ॲड श्रीनिवास क्षीरसागर जिल्हा संपर्कप्रमुख, डॉ तानाजी चंदावर डॉक्टर सेल प्रेदश उपाध्यक्ष, रंजनाताई कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडली.
या बैठकीत शिवसेना पदाधिकारी यांना पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी कुडाळकर यांनी यांनी केले यावेळी बोलताना माजी आमदार भालेराव म्हणाले की, उदगीर विधानसभा शिवसेनेचा बालेकिल्ला करणार.
ॲड श्रीनिवास क्षीरसागर, रंजनाताई कुलकर्णी यांनीही मार्गदर्शन झाले, प्रास्ताविक जिल्हाप्रमुख चंद्रकांत टेंगेटोल यांनी केले. त्यांनी येत्या सहा महिन्यात गाव आणि वॉर्ड तिथे शिवसेना शाखा बांधणी करणार असल्याचे सांगितले.
उदगीर-जळकोट शिवसेना पक्ष बांधणी आणि नियुक्या पूर्ण झालेला अहवाल कुडाळकर यांच्याकडे सोपविण्यात आला.
यावेळी पांडुरंग बिरादार, उर्मिला भगत, संदीप कुलकर्णी, अनिल पंचाक्षरी, माधव टेपाले, मुक्तेश्र्वर पाटील, संजय देशमुख, शिवलिंग बोधले, मनोज पाटील, लाखन कांबळे, संजय राठोड, अनिल ढोबळे आदी उपस्थित होते.

# शिवसेना शिंदे गटाच्या मेळाव्यात राडा




तभा वृत्तसेवा
निलंगा दि, १४ एप्रिल : शिवसेना शिंदे गटाच्या निलंगा विधानसभा कार्यकर्ता मेळाव्यात तुफान राडा पाहायला मिळाला. मुंबईचे आमदार आणि संपर्कप्रमुख मंगेश कुडाळकर यांच्या उपस्थितीतच कार्यकर्त्यांचे शिवसेना पक्षांतर्गतचे दोन गट आपापसात भिडल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण होवून मेळाव्यात गोंधळ झाला .
निलंगा शहरातील टाऊन हॉल येथे शिवसेना शिंदे गटाचा पदाधिकारी आणि कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याला मुख्य मार्गदर्शक म्हणून आमदार मंगेश कुडाळकर उपस्थित होते. मात्र, मेळावा सुरू असतानाच शिंदे सेनेतील अंतर्गत गटबाजी उफाळून आली. जिल्हाप्रमुख शिवाजी माने यांच्या कार्यपद्धतीवर नाराज असलेल्या कार्यकर्त्यांनी आमदार कुडाळकर यांच्यासमोरच जोरदार घोषणाबाजी सुरू केली. जिल्हाप्रमुख हटाव, शिवसेना वाचवा अशा घोषणा देत कार्यकर्त्यांनी आपला रोष व्यक्त केला.
यावेळी दोन्ही गट एकमेकांसमोर ठाकल्याने मेळाव्यात मोठा गोंधळ निर्माण झाला. आमदार मंगेश कुडाळकर आणि इतर वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी संतप्त कार्यकर्त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला, मात्र कार्यकर्त्यांचा संताप शांत होत नव्हता. या राड्यामुळे नियोजित कार्यक्रमात मोठा व्यत्यय आला असून, निलंग्यातील शिंदे गटातील उभी फूट आता चव्हाट्यावर आली आहे.
भविष्यातील होणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर संघटना मजबूत करण्यासाठी गेलेल्या आमदारांसमोरच असा राडा झाल्याने वरिष्ठ पातळीवरून आता काय कारवाई केली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.
माजी आमदार सुधाकर भालेराव भाषण करत असताना लातूर जिल्हा संपर्कप्रमुख रंजनाताई कुलकर्णी आदी मान्यवरांच्या समोर शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाप्रमुख शिवाजी माने यांच्यावर माझी उपजिल्हाप्रमुख सुधीर पाटील विनोद आर्य माजी तालुका प्रमुख भगवान जाधव यांनी रोष व्यक्त करत शिवाजी माने यांना पदावून हटवा असा पवित्रा घेतला होता त्यामुळे आमदार मंगेश कुडाळकर यांनी दोन्ही गटामध्ये समन्वय निर्माण करण्याचा प्रयत्न केला परंतु परिस्थिती हाताबाहेर गेली होती यामुळे लातूर जिल्ह्यातील औसा आणि निलंगा शिवसेना शिंदे गटामध्ये दोन गट एकमेकांसमोर भिडल्याने पदाधिकाऱ्यांची एकच तारांबळ उडाली होती.

# कलापंढरी संस्थेत डॉ.आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

तभा वृत्तसेवा
निलंगा दि, १४ एप्रिल : कलापंढरी सामाजिक संस्थेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आज संस्थेच्या कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.
कार्यक्रमाची सुरुवात शिल्पा देहाड कार्यक्रम व्यवस्थापक क्राय संस्था मुंबई यांच्याहस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.
सदर कार्यक्रमास बी. पी. सूर्यवंशी, शिवदर्शन सदाकाळे, जयवंत जंगापल्ले, धनराज पवार, नादिर शेख, सुर्यकांत हाके, नितीन समुखराव, कांचन भोसले, जयश्री क्षीरसागर, प्रीती काळे, पूनम सूर्यवंशी आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

CMYK

धाराशिव

# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## रा.स्व. संघाकडून आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ एप्रिल -**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

जिल्हा संघचालक ॲड. रविंद्र कदम व हभप. सागर



महाराज सलगरे यांच्या हस्ते कार्यक्रम पार पडला. यावेळी विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे धाराशिव जिल्ह्यातील प्रत्येक तालुका स्थानी सुद्धा स्थानिक कार्यकर्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून जल्लोष साजरा करण्यात आला.



# अवकाळी पावसाने केळी बाग उद्ध्वस्त; आ. तानाजीराव सावंत यांचा मदतीचा हात



**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१४ एप्रिल -**
तालुक्यातील ईट येथील कष्टकरी शेतकरी सुधीर भोसले यांची केळीची बाग अवकाळी पाऊस व जोरदार वादळामुळे पूर्णपणे जमीनदोस्त झाली असून त्यांचे शंभर टक्के नुकसान झाले आहे. २ एप्रिल २०२६ रोजी घडलेल्या या घटनेमुळे त्यांच्या कुटुंबावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे.

मेहनतीने उभी केलेली बाग काही तासांत उद्ध्वस्त झाल्याने शेतकरी भोसले यांना मोठा धक्का बसला आहे. अशा कठीण परिस्थितीत आमदार प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांनी संवेदनशीलता दाखवत भैरवनाथ उद्योग समूहाच्या माध्यमातून एक लाख रुपयांची आर्थिक मदत धनादेशाद्वारे दिली.

ही मदत म्हणजे केवळ आर्थिक आधार नसून संकटात सापडलेल्या शेतकऱ्यासाठी आशेचा किरण ठरली आहे. यावेळी आमदार सावंत यांनी शेतकऱ्याची भेट घेऊन त्यांना धीर दिला तसेच शासकीय मदत लवकर मिळावी यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू असल्याचे सांगितले.

याप्रसंगी प्रवीण रणबागुल, केशव सावंत, दत्ताअण्णा साळुंके, बाळासाहेब मांगले, जाकीर सौदागर, संजय गाढवे, अण्णासाहेब देशमुख, सुनील देशमुख, प्रवीण देशमुख, युवराज हुंबे, नागनाथ नाईकवाडी, विकी चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या मदतीमुळे शेतकरी भोसले यांना पुन्हा उभारी मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

**मानवी भावनेचा प्रत्यय...**

कष्ट करून उभी केलेली बाग एका क्षणात नष्ट झाल्यावर शेतकऱ्याच्या डोळ्यातील अश्रू शब्दात मांडता येत नाहीत; मात्र अशा वेळी कुणीतरी पाठीशी उभं राहतं, हीच खरी माणुसकी आहे, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

# यमगरवाडी येथील एकलव्य विद्या संकुलात डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात




**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१४ एप्रिल -**
यमगरवाडी येथील एकलव्य विद्या संकुलात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

कार्यक्रमाची सुरुवात बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या वक्तृत्वातून डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा गौरव केला.

यावेळी ज्ञानेश्वरी भोजने व सुजाता गणवीर यांनी बाबासाहेबांवरील गीत सादर करून वातावरण भारावून टाकले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते कोंडीबा देवकर यांनी आपल्या मार्गदर्शनात डॉ. आंबेडकर यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग उलगडले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समृद्धी कोल्हटकर व प्रतीक्षा गायकवाड यांनी केले, तर आभार प्रांजल मोहिते यांनी मानले. कार्यक्रमास विठ्ठल म्हेत्रे, अण्णासाहेब कोल्हटकर, संतोष बनसोडे, दयानंद भडंगे, अण्णासाहेब मगर, हरीश मगदूम, फुलाजी ताटी कुंडलवार, संगीता पाचंगे, प्रणिता शेटकार, निर्मला हुग्गे, रमाकांत पवार, यशवंत निंबाळकर, खंडू काळे आदी उपस्थित होते.

# जयप्रकाश विद्यालयात डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ एप्रिल -**
जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाष दादा कोळगे होते. यावेळी आगतराव डोंगरे यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार व श्रीफळ अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



याच प्रसंगी संस्थाध्यक्ष सुभाष दादा कोळगे यांच्या हस्ते सहशिक्षक आकाडे सर यांचा वाढदिवसानिमित्त शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. मार्गदर्शन करताना रामदास कोळगे यांनी डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव करत शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा त्यांचा संदेश समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. त्यांनी सामाजिक न्याय, शिक्षण व शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत डॉ. आंबेडकरांनी केलेल्या कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाला राजनारायण कोळगे, जयप्रकाश कोळगे, शिवकन्या साळुंके, संतोष कपाळे, नानासाहेब शेलार, काकासाहेब डोंगरे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश शेटे यांनी केले, तर आभार अरुण माने यांनी मानले.

# गिरवली येथे शेकडो कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१४ एप्रिल -**
तालुक्यातील गिरवली येथील 'आशिर्वाद निवास' येथे माजी आमदार राहुल मोटे यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

या प्रवेश सोहळ्यात पारा (ता. वाशी) येथील अतुल चौधरी यांच्यासह ग्रामपंचायतचे माजी सदस्य राजेंद्र ढाकणे, चंद्रकांत वैद्य, आशिफ शेख, विलास बापू चौधरी, बालाजी चौधरी, शकील सय्यद, किरण शिनगारे, श्रीमंत हनमार, अच्युत ढाकणे, सूर्यकांत पांचाळ, अशोक भराटे आदींसह शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले. कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

# जवाहर महाविद्यालयात भीमगीतांद्वारे आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१४ एप्रिल -**
क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त जवाहर महाविद्यालय, अणदूर येथे भीमगीत गायन व अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव रामचंद्र आलूरे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, डॉ. अंकुश कदम, दयानंद काळुंके, संयोजक डॉ. सुनील राजपूत, डॉ. मल्लिनाथ बिराजदार, डॉ. विवेकानंद वाहुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना रामचंद्र आलूरे यांनी महात्मा बुद्ध, महात्मा बसवेश्वर, महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. वाचाल तर वाचाल, संघर्षाशिवाय यश नाही, असा संदेश त्यांनी दिला.

कार्यक्रमात पंचशील गायन पार्टीचे अध्यक्ष कैलास गायकवाड, काशिनाथ कांबळे, रमेश कांबळे, चंद्रकांत दुपारगुडे व सहकाऱ्यांनी भीमगीतांचे सादरीकरण करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. जयंती भीमाची, बोले गाव गाव सारे यांसारख्या गीतांद्वारे सामाजिक प्रबोधन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी महापुरुषांच्या विचारांवर चालण्याचे महत्त्व अधोरेखित केले. सहभागी कलाकारांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुनील राजपूत यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. मल्लिनाथ बिराजदार व डॉ. प्रसन्न कंदले यांनी केले, तर आभार डॉ. विवेकानंद वाहुळे यांनी मानले. कार्यक्रमासाठी विजयकुमार बागडे, संतोष चौधरी, दिलीप चव्हाण, महादेव काकडे, नामदेव काळे, शुभांगी स्वामी, गणेश सर्जे यांचे सहकार्य लाभले.

# ईट येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१४ एप्रिल -**
तालुक्यातील ईट येथील मुख्य चौकात भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सार्वजनिक जयंतीनिमित्त मंगळवारी (दि.१४) कार्यक्रम पार पडला.

यावेळी महामानवाच्या प्रतिमेचे पूजन करून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्प अर्पण करण्यात आले. शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा संदेश देत डॉ. आंबेडकरांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात सर्व पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी सहभाग नोंदवला. यावेळी प्रताप देशमुख, काकासाहेब चव्हाण, प्रवीण देशमुख, सुनील देशमुख, सयाजी हुंबे, अशोक माने, निलेश चव्हाण, युवराज हुंबे, ईश्वर देशमुख, उत्तमराव गुळवे, प्रमोद देशपांडे, दत्ता अहिरे, समर्थ हुंबे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बाबासाहेब थोरात, बाळासाहेब काळखैर, अक्षय काळखैर, सुरज काळखैर, सुरेश टिळेकर, सूरज थोरात, पोन्टिंग जावळे, सुभाष अहिरे आदी भीमसैनिकांनी परिश्रम घेतले.

# नळदुर्ग येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१४ एप्रिल -**
येथील नगरपरिषद परिसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी सांगितले की, डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यतेचा नायनाट करण्यासाठी बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा स्वीकार करून समाजात समता व अखंडता प्रस्थापित केली. जातिव्यवस्थेचे निर्मूलन करून त्यांनी समाजातील विषमता दूर करण्याचे महान कार्य केले. प्रारंभी भगवान गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुष्प, दीप व धूप अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अरविंद बेडगे, सुशांत भुमकर तसेच नळदुर्ग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकिशोर सोळंके यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाबासाहेब बनसोडे यांनी केले.

यावेळी आयपीएस अधिकारी मेघना, नगरपालिकेचे बांधकाम सभापती शशिकांत पुदाले, पाणीपुरवठा सभापती तानाजी जाधव, आरोग्य व दिवाबत्ती सभापती सुमनताई ठाकुर, नगरसेविका राणी सुरवसे, साक्षी नळदुर्गकर, नगरसेवक दत्तात्रय दासकर, मारुती खारवे, कमलगायकवाड, प्रवीण गायकवाड, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार दादासाहेब बनसोडे यांनी मानले.

# उमरगा येथे वाहतुकीस अडथळा; रिक्षाचालकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ एप्रिल -**
शहरातील इंदिरा चौक परिसरात सार्वजनिक रस्त्यावर धोकादायकरीत्या ऑटो रिक्षा उभी करून वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याप्रकरणी एका व्यक्तीवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

या प्रकरणातील आरोपी बाबुराव लक्ष्मण विभुते (वय ७३, रा. चिंचोली जाहगीर ता. उमरगा) यांनी दि.१२ मार्च रोजी सायंकाळी ५.३० वाजता आपल्या ताब्यातील ऑटो रिक्षा (क्र. एमएच १२ एचसी ४६६३) बसस्थानकाजवळील इंदिरा चौक मुख्य रस्त्यावर उभी केली होती.

सदर वाहन सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायक ठरत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर उमरगा पोलिसांनी तत्काळ कारवाई केली.

# तुळजापूरमध्ये महाविकास आघाडीच्या वतीने डॉ. आंबेडकर जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१४ एप्रिल -**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त तुळजापूर येथे महाविकास आघाडीच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करून उत्साहात जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी महामानव बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. कार्यक्रमादरम्यान नाना शितोळे यांनी गीत गायन सादर केले. यावेळी भाई उत्तम अमृतराव, नगरसेवक अमोल कुतवळ, ऋषीकेश मगर, सुधीर कदम यांनी डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा घेत विचार मांडले. यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासही पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पुढे बाबासाहेब आंबेडकर चौकात अन्नदानाचा कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमाला रणजित इंगळे, अमर मगर, श्याम पवार, आनंद जगताप, अक्षय परमेश्वर, अनिता वाघे, बाबासाहेब कदम, पिंटू पांडागाळे, राहुल खपले, गोरख पवार, सुनील शिंदे, छोटू पाटील, युसूफ शेख, प्रमोद कांबळे, श्रीकांत रसाळ, महादू कदम, अर्जुन भोजने, अजिंक्य दांडे, सुदर्शन वाघमारे, बालाजी तट, नरेश पेंदे, विराज जगदाळे यांच्यासह महाविकास आघाडीचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.



# बी.आर. ग्रुपच्या वतीने डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१४ एप्रिल -**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त इंदिरानगर येथे बी.आर. ग्रुपच्या वतीने कार्यक्रम उत्साहात पार पडला.

यावेळी काँग्रेसचे नेते अशोक जगदाळे यांनी बाबासाहेबांचे विचार सर्व समाजापर्यंत पोहोचवण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते डॉ. आंबेडकर व भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेचे पूजन करून उपस्थितांचा सत्कार करण्यात आला. विविध मान्यवरांनी विचार मांडले.

या कार्यक्रमास स्थानिक मान्यवर, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तुळजाभवानी महाविद्यालयात डॉ. आंबेडकरांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१४ एप्रिल -**
येथील तुळजाभवानी महाविद्यालयात दि.१४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन पवार यांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने करण्यात आली. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. ज्योतिर्लिंग क्षीरसागर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात त्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या सामाजिक, राजकीय व शैक्षणिक कार्याचा आढावा घेत जातिभेद निर्मूलनासाठी त्यांनी केलेल्या कार्याचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी अर्थशास्त्र विषयात पीएच.डी. प्राप्त करून बॅरिस्टर पदवी घेत उत्तम कायदेपंडित म्हणून देशाला दिलेल्या योगदानाचा उल्लेख केला. तसेच महिलांकरिता व बालकल्याणासाठी त्यांनी केलेल्या कार्यावरही प्रकाश टाकला. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या त्यांच्या विचारांचा अंगीकार करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. मंत्री आर. आडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. वनिता बाबर यांनी मानले. यावेळी डॉ. काळे, डॉ.एफ.एम. तांबोळी, अधटराव, डॉ. बालाजी नगरे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# लातूर शहर परिसरात उष्मा वाढला

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १४ एप्रिल : मागच्या दोन दिवसांपासून लातूर शहर व परिसरात उष्मा वाढला असून वाढत्या उष्म्यामुळे नागरिकांची अक्षरशः काहिली होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

यावर्षी अगदी फेब्रुवारीच्या मध्यापासूनच उन्हाळ्याचे संकेत मिळत होते. तेव्हाच यावर्षी उन्हाळा असह्य राहिल असा अंदाज वर्तवला जात होता. तो रास्त ठरला आहे. एप्रिलच्या मध्यात उष्णतेचे प्रमाण सातत्याने वाढताना दिसत आहे. त्यातच मागच्या तीनचार दिवसांपासून उष्म्यामध्ये खूप वाढ झाली आहे. वाढत्या उष्म्यामुळे नागरिकांना दिवसा घराबाहेर पडणे कठीण झाले आहे. उन्हाच्या झळांचा सामना टाळण्यासाठी लोक सावलीचा आधार घेत असल्याचे पाहायला मिळत आहे. त्याचप्रमाणे वाढत्या उष्म्यापासून शरीराला थंडावा मिळावा यासाठी नागरिक ऊसाचा रस, ज्यूस आदी शीतपेयांचे सेवन करत असल्याचे पाहायला मिळते.



## विविध वृत्त...

### रस्ता दुरुस्त करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १४ एप्रिल : लातूर तालुक्यातील बाभळगाव ते शिरूर अनंतपाळ तालुक्याला जोडणारा महत्त्वाचा मार्गावर सध्या पूर्णपणे खड्डे पडले असून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या रस्त्याच्या तात्काळ दुरुस्तीची मागणी वाहनधारकातून केली जात आहे.

बाभळगाव, सेलू, शिवणी खुर्द, बोरी, मुशिराबाद, बोकनगाव आणि बिंदगीहाळ या गावांना जोडणारा रस्ता अत्यंत खराब अवस्थेत आहे. या मार्गावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून अनेक ठिकाणी डांबरीकरण पूर्णपणे निघून गेले आहे. वाहन चालविताना वाहन चालकांना कसरत करावी लागत आहे. विशेषतः दुचाकीस्वारांसाठी हा रस्ता जीवघेणा ठरत असून चारचाकी वाहनांचेही मोठे नुकसान होत आहे.

या मार्गावरून शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी आणि कामगार मोठ्या प्रमाणात ये-जा करतात. मात्र खराब रस्त्यांमुळे शेतकऱ्यांना शेतमाल वेळेत बाजारात पोहोचविणे कठीण होत आहे. विद्यार्थ्यांनाही शाळा व महाविद्यालयात जाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्यात या रस्त्याची परिस्थिती आणखी बिकट होते. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका व इतर सेवा वेळेत पोहोचू शकणार नाहीत, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत. या पार्श्र्वभूमीवर प्रशासनाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

### सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचा ठिय्या

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १४ एप्रिल : जिल्हा परिषद सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे माहे मार्चचे निवृत्तीवेतन प्रशासनाच्या उदासीनतेमुळे अद्याप खात्यावर जमा न झाल्यामुळे संघटनेच्या वतीने जिल्हा परिषदेच्या महाद्वारात ठिय्या आंदोलन करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा उषा पाटील यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी शाम वाखर्डे यांना सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन तात्काळ बँक खातेवर जमा करण्याबाबत सर्व गटविकास अधिकाऱ्यांना सूचना देण्यात याव्यात असे सांगितले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी शाम वाखर्डे यांनी सर्व तालुक्याना निवृत्तीवेतन तात्काळ जमा करण्याबाबत सूचना दिल्या व लवकरच सर्वांना निवृत्तीवेतन मिळेल असे

सांगितले. त्यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी वाखर्डे यांना सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्र्न तात्काळ सोडविणे बाबत संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी वाखर्डे यांनी निवेदनावर सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल व यापुढे दर महा एक तारखेला पेन्शन बँक खातेवर जमा करण्याची कार्यवाही केली जाईल असे सांगितले.

यावेळी सेवानिवृत्त कर्मचारी अध्यक्ष भातांब्रेकर संघटनेचे भानुदास, एनाडले जी. बी., मन्मथ शेटे, दिनकर आळंगे, आर. ए. ढेकणे, स्वयंप्रकाश गोस्वामी, डी. डी. भिसे, संजय माने, झेड. ए. सय्यद, शृंगारे, वडवळे, धावरे, खडबडे, गव्हाणे, जाधव, कुलकर्णी, जाधव, गवळी, दुरुगकर हजारे सत्तार, वजीद सय्यद, अंकुलगे, शिंदे उपस्थित होते.

### अंजली नगरमध्ये १५ जणांनी केले रक्तदान

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १४ एप्रिल : येथील अंजली नगरमधील संविधान बौध्द विहार जयंती उत्सव समितीच्यावतीने महात्मा फुले यांच्या जयंतीनिमीत्त रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते.

या शिबीरात एकूण १५ जणांनी रक्तदान केले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विनम्र आदरांजली वाहण्यासाठी लातुरात जनसागर उसळला

# भारतरत्न डॉ. आंबेडकर हे आधुनिक भारताचे शिल्पकार : भिक्खू पय्यानंद थेरो





तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १४ एप्रिल : भारतीय संविधानाचे शिल्पकार युगपुरुष, महामानव, विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त लातूर शहरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर १३५ वी सार्वजनिक जयंती उत्सव समिती द्वारे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे भव्य आणि उत्साहपूर्ण वातावरणात मुख्य ध्वजारोहण सोहळा पार पडला. प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून वंदन करण्यात आले त्यानंतर पु.भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर भिक्खू पय्यानंद थेरो यांनी उपस्थितांना त्रिसरण व पंचशील दिले. डॉ.आंबेडकरांना विनम्र आदरांजली वाहण्यासाठी लातुरात अक्षरशः जनसागर उसळल्याचे पाहायला मिळाले.

पुढे बोलताना पय्यानंद थेरो म्हणाले की भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे खरे शिल्पकार असून त्यांनी दिलेले भारतीय संविधान ही या देशासाठी अत्यंत महान आणि अमूल्य देणगी आहे. या संविधानाच्या भक्कम पायावरच भारत देश आज अखंड, लोकशाही आणि न्यायप्रिय मार्गाने प्रगती करत आहे. बाबासाहेबांनी केवळ संविधानाची निर्मिती केली नाही, तर त्यांनी समाजाला समता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांचे अनमोल तत्त्व दिले. त्यांनी आयुष्यभर अन्याय, भेदभाव आणि अस्पृश्यतेविरुद्ध लढा देत वंचित, शोषित आणि दुर्बल घटकांना सन्मानाने जगण्याचा हक्क मिळवून दिला. त्यांचे विचार आणि कार्य आजही समाजाला योग्य दिशा देणारे दीपस्तंभ आहेत.

बौद्ध धम्माच्या माध्यमातून त्यांनी मानवतेचा, करुणेचा आणि विवेकाचा मार्ग दाखवला. त्रिसरण आणि पंचशील ही तत्त्वे आपल्या दैनंदिन जीवनात अंगीकारल्यास समाजात शांतता, सौहार्द आणि नैतिकता नक्कीच वाढेल. आजच्या काळात बाबासाहेबांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात, कारण ते आपल्याला एकत्र राहण्याची, परस्पर आदराची आणि न्यायाने वागण्याची शिकवण देतात.

अशा या भारताच्या भाग्यविधात्याची १३५ वी जयंती साजरी करत असताना, आपण केवळ उत्सव साजरा करून थांबू नये, तर त्यांच्या विचारांचा अवलंब करून समाज परिवर्तनासाठी कार्य करणे ही आपली जबाबदारी आहे. शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्यांच्या मंत्राचा स्वीकार करून आपण समाजात सकारात्मक बदल घडवू शकतो.

याप्रसंगी लातूर शहराच्या प्रथम नागरिक महापौर जयश्री सोनकांबळे व स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले यांनी शुभेच्छा दिल्या.

भाजपच्या प्रदेश उपाध्यक्षा डॉ. अर्चना पाटील चाकूरकर, भंते बोधिराज, सार्वजनिक जयंती समितीचे अध्यक्ष गोविंद कांबळे, चंद्रकांत चिकटे, मोहन माने, केशव कांबळे, प्रा. अनंत लांडगे, नगरसेवक विनय जाकते, विनोद खटके, लाला सुरवसे, मयूर बनसोडे, लक्ष्मण कांबळे, प्रा. यु. डी. गायकवाड, बसवंतप्पा उबाळे, उदय सोनवणे, अनिरुद्ध बनसोडे, ज्योतीराम लामतुरे, यशपाल कांबळे, संतोष सूर्यवंशी, नगरसेवक अमोल लांडगे, राहुल डुमने, अजित पाटील कव्हेकर, एन. डी. सोनकांबळे, पृथ्वीराज शिरसाठ, कुमार सोनकांबळे, नगरसेवक अतिश चिकटे, मिलिंद धावारे, सुशील चिकटे, आशा चिकटे यांच्या सह समाजातील बौद्ध उपासक-उपासिका, धम्मप्रेमी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी डॉ. आंबेडकरांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन केले.

# आजपासून अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवाडा

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १४ एप्रिल : लातूर पाटबंधारे विभागामार्फत १५ ते ३० एप्रिल या कालावधीत 'पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवडा २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. जलसंपत्तीचे योग्य नियोजन करणे आणि लाभधारकांमध्ये या कार्यक्रमांची माहिती देऊन जागृती निर्माण करणे हा या पंधरवड्याचा मुख्य उद्देश आहे. या मोहिमेची सुरुवात बुधवार, दि. १५ एप्रिल पासून होणार आहे.

या पंधरवडा कालावधीत विविध उपक्रम राबविले जाणार असून, १६ एप्रिल रोजी जलसंपदा अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाईल, तर १७ एप्रिल रोजी 'स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय' आणि रेन वॉटर हार्वे स्टिंगविषयक उपक्रम राबविला जाणार आहे. १८ एप्रिल रोजी शेतकरी व पाणी वापर संस्थांशी संवाद साधला जाईल आणि १९ एप्रिल रोजी 'जागतिक महिला शेतकरी वर्ष' निमित्त विशेष कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. पुढील टप्प्यात २० ते २२ एप्रिल दरम्यान भूसंपादन व पुनर्वसनाच्या अडचणी सोडविणे, कालवा संयुक्त पाहणी, धरण व कालवा स्वच्छता अभियान, नदी प्रदूषण नियंत्रण आणि उपसा सिंचन परवान्याबाबतच्या तक्रारींचे निवारण केले जाईल.

२३ एप्रिल रोजी जलसंपदा व कृषी विभागामार्फत संयुक्तपणे पीक पद्धती बदल, उत्पादकता वाढ आणि पाण्याचे नियोजन यावर कार्यशाळा व प्रदर्शने आयोजित केली जातील. २४ एप्रिलला सिंचन ई-प्रणाली आणि पाणीपट्टी वसुलीबाबत तक्रार निवारण होईल, तर २५ एप्रिलला विद्यापीठ, केव्हीके व सेवाभावी संस्थांशी संवाद साधला जाईल. पंधरवड्याच्या शेवटच्या टप्प्यात स्थानिक स्वराज्य

संस्थांचे जललेखा परीक्षण, आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन आणि महसूल विभागाच्या समन्वयाने सातबारा उतारा दुरुस्ती व अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही केली जाणार आहे. २९ एप्रिल रोजी पाणी वापर संस्थांच्या सक्षमीकरणासाठी चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे.

या विशेष मोहिमेचा समारोप ३० एप्रिल रोजी लातूर येथे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या उपस्थितीत होईल. यावेळी महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार असून, पंधरवडा कालावधीत नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या अभियंत्यांचा विशेष सत्कार देखील करण्यात येणार आ-हे. तरी लाभक्षेत्रातील सर्व सिंचन लाभधारकांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन कार्यकारी अभियंता आर.एस.. जगताप यांनी केले आहे.

## डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त डॉ. बास्टेवाड यांनी केले अभिवादन



तभा वृत्तसेवा

लातूर,दि.१४ एप्रिल: भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे झालेल्या या कार्यक्रमाला पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त मानसी मीना, लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त बलभीम शिंदे, समाज कल्याण सहायक आयुक्त यादव गायकवाड, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी उपस्थित होते.

# आठवण आईची : तिसरे पुण्यस्मरण



वडिलांचे तर मोल आहेच, आहे. यांच्या संस्कारामुळे आम्ही घडलो परंतु दादा ज्यावेळी गेले त्यामुळे आईची साथ असल्यामुळेदादा गेल्याचे दुःख तर अभाळा एवढे होते पण मोठा आधार ही आइ; होती. आईकडे पाहूनच सर्व बहिण व भाऊ यांना आपले दुःख व्यक्त करावे लागत असे. परंतु आई माझ्या आयुष्यातल्या हक्काचे पुस्तक, कादंबरी म्हणजे माझी आई प्रत्येकाचा चेहरा पाहून प्रत्येक लेकराचा तिला अभ्यास असे. मग तो कोणीही असो म्हणजे मुलगा, मुलगी किंवा सर्व नातवंडे आई तुला जावून आज तीन वर्ष होतात. पण अगदी तुझी आठवण सतत येते तू असल्याचा भास होतो. आई रात्री तु माझ्या स्वप्नात आली होती. पण काहीच बोलली नाहीस. १४ एप्रिल ही तारीख जशी, जशी जवळ येते तशी तुझी उणीव जास्तच जाणवते ग आई ! सगळ्यांचे कौतुक, माया करणे एवढे तुला कसे जमत होतं ग आई याचं कौतुक करावे तेवढे कमीच आहे.

आई तुझी आठवण आली की सगळे चित्र उभे समोर दिसते, तुझे राहणीमान, स्वच्छता, निटनिटकेपणा, समजदारपणा या सगळ्या गोष्टी आठवतात. तु घरी आलीस म्हणजे घरातील लोकांना सकारात्मक ऊर्जा मिळत असे व घर ही आनंदमय राहत असे. आई तू माझ्या सुखा दुःखाची तिजोरी होतीस.

मी नोकरी करत असताना आई माझे प्रमोशन झाले त्यावेळी त्या प्रत्येक वेळी नवीन खुर्चीत बसताना मी अगोदर तुला फोन करायची व माझ्या नवीन कामाला सुरूवात करायचो. तुझा आवाज जरी ऐकला ना तर एक स्फुर्ती मिळत असे व काम करण्याची मोठी ताकद मिळायची, एवढे कशाला हेडऑफिसचे साहेब येणार व ऑफिसचे ऑडीट असणार त्यामुळे मला सकाळी कामाच्या घाईमुळे तुला फोन करता आला नाही. तरी ऑफिसमध्ये गेल्यावर अगोदर मी तुला फोन करून तुझा आवाज ऐकत असे व तुला आज साहेब येणार आहेत, मला दुपारी फाने करता येणार नाही हे वाक्य सांगायची गरजच पडत नसे, तु अगोदर बाळा तू तुझ्या कामाचे बघ व तुझे काम संपल्यावर घरी गेल्यावर फोन कर इतकी कशी तुझ्यामध्ये हुशारी होती ग आई? आईची अगदी सुरवातीपासूनची एक शिवी असे 'बापाने शाळेत घालून लय शाहणे केलय'. आईसारखे दैवत नाही, आई माझ्या मायेचा सागर होती. आई तू गेलीस त्यादिवसापासून प्रमे संपल असे वाटतं. आमच्या सगळ्यांचा मायेचा दिवा विझला असे वाटते. आई ही या जगातील सर्वांत पवित्र, प्रेमळ आणि निःस्वार्थी मुर्ती म्हणजे आई. आई तुझ्या विषयी किती ही लिहिले तरी कमीत आहे. आई माझ्या जीवनातील तू एक अनमोल पुस्तक आहेस, तु नाहीस पण जोकांही माझ्या जीवनात कोणताही प्रसंग असू देत त्यावेळी तुझ्या विषयीचे एक पान त्या पुस्तकाचे प्रसंगाप्रमाणे समोर आल्याशिवाय राहत नाही आई !

आई तुझ्या पिल्लावरती अशीच मायेची ऊब व तुझी सावली सदैव आम्हा सर्वांवर आहेच व असावी अशी इच्छा परत व्यक्त करते तू जेथे असशील तेथून तू आमच्याकडे पाहत असशिल, तुझा प्रवास सुखाचा होवो ही व तुझ्या आत्म्यास शांती लाभो हीच प्रार्थना आई !

आयुष्यातून कोणी निघून गेल्यावर आयुष्य थांबत नाही हे जरी खरे असले तरी एक गोष्ट खरीच आहे. लाखो लोक आपल्या आयुष्यात येतील जातील पण एका आईची उणीव कोणीही पूर्ण करू शकत नाही.

आई तुझ्या विषयी भरपूर लिहावंस वाटतं डोळ्यासमोर भरपूर प्रसंग आहेत. पण डोळ्यातील पाणी काही थांबत नाही. आई तू आमचा आत्मा होतीस. आई तू हिरवा सुंदर असा मळा होतीस. तुझ्या प्रेमाला कोणताही माप दंड नव्हता, सर्व लेकरांना सारखेपणा मायेची ऊब देणारी मखमली गालीचा होतीस, तू आमची गोड मिठाई जी की त्यातून किती ही खाल्ली तरी ती कधीच संपत नव्हती. परत हवी, हवी वाटते अशी ती आमची आई होती. जी सर्वांना हवी, हवी वाटत असे अशी आमची आई होती..

आई पवित्र तुझी स्मृती. ..अनंत तुझी माया
नित्य असूदे आमच्यावरती अखंड तुझी छाया

सौ. बेबीनंदा जाधव

## आयपीएल सट्टा प्रकरणी चार आरोपी अटकेत

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १४ एप्रिल : स्थानिक गुन्हे शाखेने पुन्हा एकदा कारवाई करत आयपीएल क्रिकेट सट्टा चालविणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत चार आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्या ताब्यातून लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सोमवार , दि. १३ एप्रिल रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने लातूर शहरातील अंबेजोगाई रोड परिसरात आयपीएल क्रिकेट सामन्यावर सट्टा नावाचा जुगार खेळत असून लोकांकडून फोनद्वारे पैशांची देवाणघेवाण करणाऱ्या वर पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वाखाली पथकाने तत्काळ सापळा रचून संबंधित ठिकाणी छापा टाकण्यात आला. छाप्यात एका चारचाकी वाहनामध्ये बसून सट्टा चालविणाऱ्या चार आरोपींना रंगेहात ताब्यात घेण्यात आले. प्राथमिक चौकशीत आरोपी हे आयपीएल सामन्यांवर सट्टा घेऊन लोकांकडून पैसे गोळा करत असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर कारवाईदरम्यान आरोपींकडून क्रिकेट सट्टा खेळण्यासाठी वापरण्यात येणारे विविध साहित्य असा एकूण १३ लाख ७३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# संविधान सप्ताहानिमित्त संविधानिक मूल्यांचा जागर



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १४ एप्रिल : समाज कल्याण विभागांतर्गत चालविण्यात येणाऱ्या मागासवर्गीय शासकीय वसतिगृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त संविधान सप्ताह उत्साहात साजरा करण्यात येत आहे. या निमित्ताने वसतिगृहातील कर्मचारी व निवासी विद्यार्थ्यांच्या सहभागातून विविध शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

संविधान संवर्धन व संरक्षणाच्या दृष्टीने भीम गीत गायन, विविध स्पर्धा तसेच तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत. त्या अनुषंगाने नुकतेच संविधानिक मूल्ये, अधिकार आणि कर्तव्ये या विषयावर विशेष व्याख्यान पार पडले. या कार्यक्रमासाठी लातूर येथील मातोश्री केशरबाई काळे अध्यापक महाविद्यालयाच्या प्राचार्या तथा संविधान सेवा संघाच्या संस्थापक अध्यक्षा प्रा. डॉ. शहेजादी शेख तसेच संविधान सेवा संघाचे संस्थापक ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. गोविंद सिरसाट हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. दोन्ही मान्यवरांनी विद्यार्थ्यांना भारतीय संविधानातील कायदे, त्यांचे बदलते स्वरूप, बेकायदेशीर कृत्यांचे परिणाम तसेच संविधानिक स्वातंत्र्य, अधिकार, कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या यांविषयी मार्गदर्शन केले. यावेळी वसतिगृहाचे व्यवस्थापक बारकुल, सराफ तसेच श्रीमती सुकळकर उपस्थित होते.